SR NO.

## परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रशासकीय भवन, मार्ग क्रमांक २७ व ३४,**
**वागळे इस्टेट,वागळे आगार,**
**ठाणे - ४०० ६०४**

## निविदा दस्तऐवज

**( बस क्र. MH-०४ G २८९६ बॉडी दुरुस्ती बाबत )**

**कार्यशाळा विभाग**

**(सन२००९- २०१०)**

**निविदा फॉर्म किंमत ५००/- अधिक विक्रीकर**

## परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
## प्रशासकीय भवन, दुसरा मजला, रोड नं.२७/३४, वागळे इस्टेट,

## ठाणे (प) ४०० ६०४.

**जा.क्र.ठामपापसे/पउव्य/निविदा सुचना/ १५५४ / २०१० दिनांक ०९ / ०२ / २०१०**

# निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेचीबस क्रमांक MH-०४ G २८९६ परिवहन सेवेच्या वागळे आगार, वागळे इस्टेट येथे उभी असून सदर बसचा अपघातामध्ये पुढिल शो डॅमेज झाला आहे. त्या अवस्थेत सर्व्हे करुन खालिल प्रमाणे कामाचे दुरुस्ती करणे करिता नामांकित ठेकेदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| कामाचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|
| १) फ्रन्ट फायबर शो (बॉडी )लेफ्ट टॉप वरिल फायबर स्ट्रक्चर रिपेअर,<br>२) समोरिल फायबर शो पॅनल नविन,<br>३) फ्रन्ट शो खालून आतिल डॅमेज स्ट्रक्चर ओके करणे.<br>४) फ्रन्ट शो ग्लास फ्रेम रिपेअरिंग<br>५) रिपेअरिंग करिता डॅश बोर्ड खोलणे व फिट करणे.<br>६) संपुर्ण बस टच अप करुन पेंट करणे<br>७) हेड लाइट सिलबिम २ नग फिटिंग सह<br>८) फ्रन्ट विंडो ग्लास रबर बिडिंग फिटिंग सह<br>९ ) सिग्नल इंडिकेटर ॲसेंब्ली २ नग फिटिंग सह<br>१० ) साईड मिरर २ नग फिटिंग सह<br>११) ड्रायव्हर सिट सेफटी बेल्ट फिटिंग सह<br>१२) ड्रायव्हर सीट वरिल उजव्या बाजूचे पॅनल डॅमेज (रिपेअरिंग)<br>१३) पॅसेंजर फ्रंट डोअर ब्रेकेट सरळ करणे<br>१४) ड्रायव्हर डोअर रिपेअर करणे<br>१५) ड्रायव्हर डोअर विंडो फ्रेम ,स्लायडिंग रिपेअर करणे.<br>१६) ड्रायव्हर डोअर डेटिग करणे<br>१७) फ्रन्ट डोअर बिडिंग व्यवस्थीत करणे.(अलायमेंट)<br>१८) फ्रन्ट डोअर कॅप सरळ करणे डेटिग करणे<br>१९) लेफ्ट बॉडी सेफ्टी पाईप सरळ करणे,नविन ब्रेकेट फिट करणे<br>२०) लेफ्ट विंडोग्लास काढून स्लायडिंग रेल सरळ करणे फ्रेम सरळ करणे<br>२१) साईड मिरर बाजूचे गटर सरळ करणे<br>२२) रिअर डोअर ग्लास दोन नग बसवणे रिअर डोअर ग्लास बिडिंग फिट करणे<br>२३) दरवाजाचे बिडिंग फिटिंग करणे चॅनल सरळ करुन बिडिंग फिट करणे.<br>२४) दरवाजाचे बिडिंग फिटिंग करणे चॅनल सरळ करुन बिडिंग फिट करणे.<br>२५) रिअर दरवाजाचे Lसाईड होल्डंग ब्रेकेट नविन फिट करणे.<br>२६) लेफ्ट साईड इंडिकेटर ॲसेब्ली नविन दोन नग फिट करणे.<br>२७) लेफ्ट साईड विंडो खालिल शो पटटी सरळ करणे बिडिंग नविन टाकणे. | - |

| | |
|---|---|
| २८) लेफ्ट साईड पॅनलल सरळ करणे पेंटिंग करणे.<br>२९) सेंटर डोअर मागिल व पुढील पॅनल सरळ करणे डेटिंग करणे.<br>३०) मागिल बंपर रिपेअर करणे | |

**अटी व शर्ती :-**

**१**) उपरोक्त निविदाबाबतचा तांत्रिक तपशील, निविदा अटी व शर्तींबाबतचा तपशील निविदा फॉर्ममध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील.

**२**) निविदा फॉर्म कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वेळ ११.०० ते १५.०० वा.पर्यंत निविदा फॉर्म किंमत (ना परतावा) रोख भरुन वरील पत्त्यावर कार्यशाळा विभाग, वागळे आगार, येथे दिनांक १०/०२ /२०१० पासून २० /०२/२०१० पर्यंत मिळेल. तसेच निविदा अनामत रक्कम रोख /परिवहन सेवेच्या नावाने डि डि (राष्ट्रीयकृत बँक) दिनांक **२२** / **०२** / २०१०रोजी ठिक १३.०० वा. पर्यंत स्वीकारणेत येईल व मोहोरबंद निविदा दिनांक २२/ **०२** /२०१० ठिक १५.०० वा.पर्यंत स्वीकारणेत येऊन,दुपारी १६.०० वाजता उघडण्यांत येतील.

**३**) कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार मा.परिवहन व्यवस्थापक यांनी राखून ठेवला आहे.

**४**) सदर बस दुरुस्तीचा कालावधी हा बस ताब्यात दिल्यापासून २० दिवस असेल.

**५**) सदर बस दुरुस्ती कालावधीस हा २० दिवसांपेक्षा अधिक विलंब झाल्यास प्रति दिन रुपये ६०००/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.

सदरची निविदा ही डब्ल्यु डब्ल्यु डब्ल्यु डॉट ठाणे महानगरपालिका, डॉट कॉम हया वेबसाईडवर उपलब्ध आहे.

सही/-
परिवहन उप व्यवस्थापक,
परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे

**अटी व शर्ती**

**१) लिफिफा क्रमांक १ (टेक्निकल बिड)**

अ) निविदा भरणा-या संस्थेने अगर ठेकेदाराने व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

ब) मुळ उत्पादक किंवा अद्यावत वर्कशॉप असल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे.

क) अशा प्रकारचे फायबर वर्क काम केल्याचा पुरावा किंवा अनुभवाचा सादर करावा.

ड) निविदा अनामत रक्कम भरल्याची छायांकित (झेरॉक्स) प्रत जोडणे आवश्यक आहे.

**(वरील सर्वकागदपत्रे पुरवठादारांनी लिफाफा क्रमांक १ मध्येजोडणे आवश्यक आहे)**

**२) लिफाफा क्रमांक २.**

१) निविदाकाराने निविदा भरतांना सोबत जोडलेल्या यादीतील सर्व आयटमचे दर भरणे आवश्यक आहे.

२) लिफाफा क्रमांक १ मध्ये कागदपत्रांची पुर्तता नसेल तर दराचा लिफाफा क्रमांक २ उघडला जाणार नाही.

३) प्रत्येक कामाचे दर स्थानिक व इतर सर्व करांसह नमुद करुन द्यावयाचे आहेत.

४) निविदा स्विकृत पत्र मिळाल्यापासून आठ दिवसांचे आंत करारनामा करुन दयावा लागेल.

५) निविदेच्या एकूण किंमतीच्या ५ % रक्कम सुरक्षा अनामत रक्कम रोख स्वरुपात परिवहन सेवेच्या नावे भरणे बंधनकारक राहील.

६) मुळ निविदा पत्रकांत कोणत्याही प्रकारची खाडाखोड करण्यांत येऊ नये. खाडाखोड केल्यास सदरची निविदा रद्द करणेबाबतचा विचार करणेत येईल.

७) निविदा मंजूर झाल्यानंतर निविदेतील बस दुरुस्तीचे काम निविदेतील मंजूर दराने काम पुर्ण करणे बंधनकारक राहील.

८) निविदा अर्ज पोष्टाने अथवा कुरिअरने पाठविले व स्वीकारले जाणार नाहीत.

९) निविदाकाराने अटी व शर्ती नमुद केलेली निविदा स्वीकारली जाणार नाही

१०) प्रत्येक निविदा लखोटयावर डावीकडील कोप-यात निविदा कोणत्या कामासाठी याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

११) निविदेचा कालावधी हा एक महिन्याकरिता वैध राहील

१२) निविदेत नमुद केलेले दर हे निविदा कालावधी व करारपत्र संपुष्टात येईपर्यत बंधनकारक राहतील.

.१३) निविदाकाराचे प्रथम वर्कशॉपचे इन्स्पेक्शन केले जाईल. संयुक्तिक व योग्य अहवालानंतरच निविदा विचार केला जाईल

१४) .कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार परिवहन व्यवस्थापक यांनी राखून ठेवला आहे.

१५) कार्यादेश मिळाल्यानंतर बस दुरुस्ती करिता स्वतःच्या वर्कशॉप मध्ये नेणे व दुरुस्ती नंतर आगारात सोडण्याची जबाबदारी दुरुस्ती धारकाची राहिल. ( चालक व डिझेल खर्चासह )

दिनांक : / / २०१०

सही/-
परिवहन उप व्यवस्थापक,
परिवहन सेवा,
ठाणेमहानगरपालिका, ठाणे

<u>**परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे**</u>

निविदा अ.क्र.

**निविदा अर्ज**

प्रति,

मा.परिवहन उप व्यवस्थापक,

परिवहन सेवा,

ठाणे महानगरपालिका,ठाणे

मी ---------------------------------------------------------------राहणार ------ --------------------------------------------------------------या अर्जाद्वारे आपणांस कळवितो कि, दिनांक / /२०१० रोजी -------------- पुरविणेकरिता आपण प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार -- --------------------- पुरविणे बद्दलचा मक्ता निविदा मंजूर झाल्यापासून एक महिन्याचा राहील. व एक महिन्याच्या कालावधीकरिता घेण्याची माझी इच्छा आहे. सदरहू मक्त्याच्या शर्ती मी समजावून घेतलेल्या आहेत. व त्या सर्व मला पुर्णपणे कबुल आहेत.

सोबत जोडलेल्या यादीतील दराप्रमाणे त्या भावाने (सर्व करांसह) ------------------------ --बस दुरुस्तीचे काम पुर्ण करुन बस आगारात पोहचविण्याचे मी कबुल करित आहे. ( नमुद केलेल्या दराव्यतिरिक्त सुट (डिस्काऊंट) दिले असेल तर स्पष्ट उल्लेख करावा)

सोबत जोडलेल्या यादीतील दर हे सर्व कर, जकातीसह असून, संबधित बस ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेच्या वागळे आगारात स्वखर्चाने पोहोचवुन देण्यास मी कबुल आहे.

अनामत रक्कम रुपये ----------- (अक्षरी रक्कम रुपये --------------------- --) ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या कार्यालयांत भरले असून, त्याची पावती क्रमांक-------------- दिनांक / / २०१०ची छायांकित (झेरॉक्स) प्रत सोबत जोडलेली आहे. माझ्या नावे निविदा मंजूर झाल्यास आपल्या निविदेतील नमुद स्पेसिफिकेशनप्रमाणे व आवश्यक्तेनुसार, तसेच मंजूर अटी व शर्तीप्रमाणे मी निविदेतीली बस दुरुस्त करुन देईन. तसे न केल्यास आपणांकडे जमा केलेल्या निविदा अनामत रक्कमेवर माझा कोणत्याही प्रकारचा हक्क रहाणार नाही. व त्याबाबत मी परिवहन सेवेसोबत आवश्यक तो करारनामा करुन देईन.

दिनांक / /२०१०

सही/--------------------------

संस्थेचे नांव पत्ता व रबरी सिल

## वचन पत्र

मी/आम्ही.............................................................................................मे..................
.................................................................
मालक/भागीदार/प्रतिनिधी असून आपण दिनांक / /२०१० रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरात सुचनेनुसार निविदा भरत आहे.

आपण दिलेली निविदा प्रपत्रे व त्यातील अटी व शर्ती या मी/आम्ही पुर्णपणे वाचून व समजावून घेतल्या असून त्या मला/आम्हाला सर्व मान्य आहेत.

निविदेत बस दुरुस्ती बाबत नमुद केलेले दर हे सर्व करांसहीत असून, सदर बस दुरुस्त करुन ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेच्या वागळे आगारात स्वखर्चाने पुरविणेस मी/आम्ही तयार आहोत.

निविदेमध्ये सादर केलेले दर हे संबधित बस दुरुस्ती कामाकरिता मर्यादित असून नमुद बस दुरुस्त करुन देणेस मी/आम्ही बंधनकारक आहोत.

मी/आम्ही ठाणे परिवहन सेवेच्या नांवे अनामत रक्कम रुपये (अक्षरी रुपये ..) भरले असून, त्याची पावती क्रमांक ...दिनांक / /२०१० ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

माझ्या/आमच्या नांवे निविदा मंजूर झाल्यास आपण दिलेल्या निविदेतील स्पेसिफिकेशनप्रमाणे, कार्यदिशाप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे व तसेच निविदेतील मंजूर अटी व शर्ती प्रमाणे मी बस दुरुस्त विहित मुदतीत/वेळेत सुचित केल्याप्रमाणे करीन.

तसेच निविदेसोबत सादर केलेली/नमुद केलेली माहिती सत्य व खरी आहे. सदर माहिती असत्य व खोटी असल्याचे निष्पन्न असल्याचे आढळून आल्यास माझी निविदा रद्द करण्यांस व अनामत रक्कम जप्त करण्यांस माझी/आमची कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

जर माझी/आमची निविदा मंजूर झाली तर मी/आम्ही नियमाप्रमाणे किंवा निविदेत नमुद केल्याप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेकडे मालाची गॅरंटी म्हणून एक वर्षाकरिता जमा करणेस तयार आहे/आहोत. या निविदेतील अटी व शर्तीकरीता मी/आम्ही परिवहन सेवेबरोबर करारनामा करण्यांस तयार आहे/आहोत.

माझी/आमची न्युनतम दराची निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे या बद्दलचा संपुर्ण अधिकार ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेस राहील व याबद्दल माझी/आमची कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक : / /२०१०

सही/-

निविदाकाराचे नांव, पुर्ण पत्ता व रबरी शिक्का

निविदाधारक/संस्था :-

सही/शिक्का, व पत्ता :-

साक्षिदार सही व पत्ता :-

## निविदा यादी सन २०१०

## निविदा यादी

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेचीबस क्रमांक MH-०४ G २८९६ परिवहन सेवेच्या वागळे आगार, वागळे इस्टेट येथे उभी असून सदर बसचा अपघातामध्ये पुढिल शो डॅमेज झाला आहे. त्या अवस्थेत सर्व्हे करुन खालिल प्रमाणे कामाचे दुरुस्ती करणे करिता नामांकित ठेकेदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| कामाचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|
| १) फ्रन्ट फायबर बॉडी लेफ्ट टॉप वरिल फायबर स्ट्रक्चर रिपेअर,<br>२) समोरिल फायबर शो पॅनल नविन,<br>३) फ्रन्ट शो खालून आतिल डॅमेज स्ट्रक्चर ओके करणे.<br>४) फ्रन्ट शो ग्लास फ्रेम रिपेअरिंग<br>५) रिपेअरिंग करिता डॅश बोर्ड खोलणे व फिट करणे.<br>६) संपुर्ण बस टच अप करुन पेंट करणे<br>७) हेड लाइट सिलबिम २ नग<br>८) फ्रन्ट विंडो ग्लास रबर बिडिंग सह<br>९ ) सिग्नल इंडिकेटर अॅसेंब्ली २ नग<br>१० ) साईड मिरर २ नग<br>११) ड्रायव्हर सिट सेफटी बेल्ट<br>१२) ड्रायव्हर सीट वरिल उजव्या बाजूचे पॅनल डॅमेज<br>१३) पॅसेंजर फ्रंट डोअर ब्रेकेट सरळ करणे<br>१४) ड्रायव्हर डोअर रिपेअर करणे<br>१५) ड्रायव्हर डोअर विंडो फ्रेम ,स्लायडिंग रिपेअर करणे.<br>१६) ड्रायव्हर डोअर डेटिग करणे<br>१७) फ्रन्ट डोअर बिडिंग व्यवस्थीत करणे.(अलायमेंट)<br>१८) फ्रन्ट डोअर कॅप सरळ करणे डेटिग करणे<br>१९) लेफ्ट बॉडी सेफ्टी पाईप सरळ करणे,नविन ब्रेकेट फिट करणे<br>२०) लेफ्ट विंडोग्लास काढून स्लायडिंग रेल सरळ करणे फ्रेम सरळ करणे<br>२१) साईड मिरर बाजूचे गटर सरळ करणे<br>२२) रिअर डोअर ग्लास दोन नग बसवणे रिअर डोअर ग्लास बिडिंग फिट करणे<br>२३) दरवाजाचे बिडिंग फिटिंग करणे चॅनल सरळ करुन बिडिंग फिट करणे.<br>२४) दरवाजाचे बिडिंग फिटिंग करणे चॅनल सरळ करुन बिडिंग फिट करणे.<br>२५) रिअर दरवाजाचे Lसाईड होल्डंग ब्रेकेट नविन फिट करणे.<br>२६) लेफ्ट साईड इंडिकेटर अॅसेब्ली नविन दोन नग फिट करणे.<br>२७) लेफ्ट साईड विंडो खालिल शो पटटी सरळ करणे बिडिंग नविन टाकणे.<br>२८) लेफ्ट साईड पॅनलल सरळ करणे पेंटिंग करणे.<br>२९) सेंटर डोअर मागिल व पुढील पॅनल सरळ करणे डेटिंग करणे.<br>३०) मागिल बंपर रिपेअर करणे | - |

**टिप :-**१) वर निर्देशित केल्याप्रमाणे सर्व स्थानिक कर जकात व शासकीय करांसह पोहोच नमुद करावेत.

दिनांक :- / /२०१०

सही/-

(संस्थेचे नांव, पत्ता व रबरी शिक्का)